आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता

४ सप्टेंबर २०२५ - गुरूवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांची सिंगापूरच्या प्रधानमंत्र्यांशी शिष्टमंडळस्तरीय चर्चा / संरक्षण तंत्रज्ञान सहकार्य आणखी बळकट करण्याबाबत दोन्ही देशांमधे सहमती

- कोळशाच्या व्यवहारासाठी शेअर बाजाराच्या धर्तीवर वेगळा मंच सुरू होणार

- जेएनपीटीच्या टर्मिनल-टू चं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि सिंगापूरचे प्रधानमंत्री लॉरेन्स वाँग यांच्या हस्ते दूरस्थ पद्धतीनं उद्घाटन

- जीएसटी सुधारणांचं मान्यवरांकडून स्वागत/ उद्योग जगतानं व्यक्त केलं समाधान

**आणि**

- इंग्लंडमध्ये आज सुरु झालेल्या जागतिक मुष्टियुद्ध स्पर्धेत भारताच्या पवन बर्तवालची विजयी सलामी

**<><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज भारताच्या दौऱ्यावर असलेले सिंगापूरचे प्रधानमंत्री लॉरेन्स वाँग यांच्याबरोबर नवी दिल्लीत द्विपक्षीय चर्चा केली. ही चर्चा फलदायी झाली असून त्यात हरित नौवहन मार्गिका, अंतराळ क्षेत्रात सहकार्य त्याचप्रमाणे नागरी विमानवाहतूक क्षेत्रातल्या संशोधन आणि नवनिर्मिती संदर्भात पाच सामंजस्य करार करण्यात आले. दोन्ही देशांमध्ये धोरणात्मक भागीदारीचा मार्ग तयार करण्यात आल्याचं परराष्ट्र खात्याच्या सचिवांनी बैठकीनंतर सांगितलं. दोन्ही देशांमध्ये आर्थिक सहकार्य, मनुष्यबळ विकास, डिजीटायजेशन, संपर्क, आरोग्य आणि औषध निर्माण, सैनिकी आणि सुरक्षा सहकार्य त्याचप्रमाणे सांस्कृतिक आदानप्रदान या आठ प्रमुख विषय़ावर सहकार्य करण्याचं निश्चित करण्यात आल्याचंही त्यांनी सांगितलं. आज सकाळी परराष्ट्र व्यवहार मंत्री डॉ.एस. जयशंकर यांनी सिंगापूरचे प्रधानमंत्री लॉरेंस वाँग यांच्याबरोबर चर्चा केली. दोन्ही देशाच्या प्रधानमंत्र्यांच्या चर्चेत परस्पर सहकार्याची नवी वाट निर्माण होईल, असं त्यांनी म्हटलं आहे.

केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनीही आज दुपारी वाँग यांची भेट घेतली. आपल्यामध्ये शालेय, उच्च, कौशल्यविकास शिक्षण आणि संशोधन तसचं नवोन्मेष संदर्भात सकारात्मक चर्चा झाल्याचं त्यांनी आपल्या पोस्टमध्ये म्हटलं आहे.

**<><><>**

क्वांटम कम्प्यूटिंग, कृत्रिम बुद्धिमत्ता, ऑटोमेशन आणि मानवरहित नौका अशा क्षेत्रांमध्ये संरक्षण तंत्रज्ञान सहकार्य आणखी बळकट करायला भारत आणि सिंगापूर या दोन देशांनी संमती दिली आहे. तसंच सागरी सुरक्षा आणि पाणबुडीद्वारे बचाव या क्षेत्रांमधलं सहकार्य कायम ठेवण्यावरही दोन्ही देशांचं एकमत झाल्याचं संयुक्त निवेदनात म्हटलं आहे. सीमेपलीकडून होणाऱ्या दहशतवादासह सर्व प्रकारच्या दहशतवादाला सडेतोड उत्तर द्यायला दोन्ही देश वचनबद्ध असल्याचा पुनरुच्चारही या दोन्ही देशांनी केला.

**<><><>**

शेअर बाजाराच्या धर्तीवर कोळशाच्या व्यवहारासाठी वेगळा मंच सुरू होणार असल्याची माहिती केंद्रीय कोळसा मंत्री जी. किशन रेड्डी यांनी आज मुंबईत दिली. कोळसा मंत्रालयाच्या स्टार रेटिंग पुरस्कार सोहळ्यात ते बोलत होते. या मंचाच्या स्थापनेला संसदेची मान्यता मिळाली आहे. या मंचाच्या माध्यमातून देशातल्या खरेदीदारांच्या गरजा पूर्ण केल्या जातील असं ते म्हणाले.

कोळसा क्षेत्रातल्या कंपन्यांनी नवनवतीन तंत्रज्ञान विकसित करावं, त्याचवेळी विविध घटकांना ध्यानात घेऊन काळजीपूर्वक खाणकाम करावं, असं आवाहन रेड्डी यांनी केलं. कोळसा नियंत्रकांच्या नव्या वेबसाईटचं अनावरणही त्यांनी केलं.

यावेळी कोळसा आणि खाणकाम क्षेत्रातल्या विविध कंपन्यांना आणि संस्थांना पुरस्कार देऊन गौरवण्यात आलं.

**<><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि सिंगापूरचे प्रधानमंत्री लॉरेन्स वाँग यांनी आज जवाहरलाल नेहरु पोर्ट ट्रस्टच्या टर्मिनल २ चं दूरदृश्य प्रणालीद्वारे उद्घघाटन केलं. यावेळी केंद्रीय बंदरे, नौवहन आणि जलवाहतूक मंत्री सर्बानंद सोनोेवाल, राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, बंदरे व नौवहन चे राज्यमंत्री शांतनू ठाकूर उपस्थित होते.  ही गोदी पूर्णपणे

सौरऊर्जेवर चालणारी असून विशेष मार्गिका असलेलं या पोर्टवरील पहिलं कंटेनर टर्मिनल आहे.

**<><><><>**

जीएसटी कररचनेतल्या सुधारणांचं सर्व क्षेत्रातून स्वागत होत आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी या सुधारणांचं कौतुक केलं आहे. जीएसटीचे दर कमी करण्याच्या सरकारच्या या निर्णयामुळे सर्वांना फायदेशीर होणार आहे. जीवनमान सुलभ करण्यासाठी दरांचं सुसूत्रीकरण आणि सुधारणांसाठी एक सविस्तर प्रस्तावही तयार केल्याचं प्रधानमंत्र्यांनी समाज माध्यमावर म्हटलं आहे.

जीएसटीमधला बदल जीवन सुलभ आणि व्यवसाय सुलभ करण्याच्या सरकारच्या प्रयत्नांवर मोठा प्रभाव टाकेल, अशी प्रतिक्रिया परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर यांनी व्यक्त केली आहे. तर जीएसटीमधली सुधारणा हे एक परिवर्तनकारी पाऊल असून शेतकरी, एमएसएमई, महिला, तरुण, मध्यमवर्गीय या सर्वांनाच दिलासादायक असल्याचं केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांनी म्हटलं आहे. ३६ जीवनरक्षक औषधांवरचा जीएसटी शून्य टक्क्यापर्यंत कमी केल्यामुळे सर्वसामान्यांचा आरोग्यसेवेवरचा खर्च कमी होईल आणि जीवनमान सुधारेल, असा विश्वास केंद्रीय आरोग्य मंत्री **जे. पी. नड्डा** यांनी व्यक्त केला आहे.

जीएसटी कररचनेतल्या सुधारणेमुळे देशातल्या प्रत्येक कुटुंबाला मदत होणार असल्याचं माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव म्हणाले.

**- - -होल्ड- बाईट- वैष्णव**. - - -

या सुधारणांमुळे अर्थव्यवस्थेला चालना मिळेल असं मुख्यमंत्री देवे◌े◌ंद्र फडनवीस म्हणाले. तर, जीएसटी सुधारणेमुळे ग्राहकांना मोठ्या प्रमाणात फायदा होईल तसंच खरेदी वाढेल, असं उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले. या सुधारणांमुळे सर्वसामान्यांना दिलासा, महागाईवर नियंत्रण आणि लहान उद्योगांना मजबुती असे अनेक उद्देश साध्य झाले आहेत, अशी प्रतिक्रिया केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री **रामदास आठवले** यांनी दिली आहे. जीएसटीमध्ये केलेल्या सुधारणांचं माजी केंद्रीय अर्थमंत्री **पी. चिदंबरम** यांनी स्वागत केलं आहे. जीएसटीमधल्या सुधारणा या आधीपासूनच लागू व्हायला हव्या होत्या, अशी

प्रतिक्रिया त्यांनी दिली. तर, काँग्रेस पक्ष दीर्घकाळपासून या सुसूत्रीकरणाची मागणी करत होता, असं काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी म्हटलंय.

**<><><><>**

उद्योग आणि व्यवसाय जगतानं या सुधारणांचं स्वागत केलं आहे. जीएसटी सुधारणेतल्या कर्जाची परतफेड आणि एमएसएमईवरचे अनुक्रमे ५ टक्के आणि १८ टक्के करांमुळे व्यवसाय प्रक्रिया सुलभ होईल, अशी प्रतिक्रिया भारतीय उद्योग महासंघ सीआयआयनं दिली आहे. तर जीएसटी सुधारणा अप्रत्यक्ष कर रचना परिपक्व झाल्याचं दर्शवतात अशी प्रतिक्रिया फिक्की अर्थात फेडरेशन ऑफ इंडियन चेंबर्स ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीनं दिली आहे. असोचेम चे मनीष सिंगल यांनी सांगितलं…

- **- होल्ड- बाईट- सिंगल** - -

या सुधारणा म्हणजे करव्यवस्थेतलं एक धाडसी पाऊल असून यामुळे मागणीला चालना मिळेल, तसंच संबंधित प्रक्रिया सोप्या होतील, अशी प्रतिक्रिया फिक्कीचे माजी अध्यक्ष शुभ्रकांत पांडा यांनी दिली आहे. लहान व्यापारी, ग्राहकांसह भारताच्या अर्थव्यवस्थेलाही फायदा होणार असल्याचं ऑल इंडिया ट्रेडर्स कॉन्फेडरेशनं म्हटलं आहे. इंडियन मर्चंट्स चेंबरनं या सुधारणांचं स्वागत केलं आहे.

सर्वसामान्यांनी या फेरबदलांबद्दल समाधान व्यक्त केलं आहे. ऐकूया मुंबईतल्या दयानिधी विद्यालयातले शिक्षक मोहन वाघ यांची प्रतिक्रीया..

- **- होल्ड- बाईट- वाघ - -**

- **<><><><>**

इंग्लंडमध्ये लिव्हरपूल इथं जागतिक मुष्टियुद्ध स्पर्धेला आजपासून सुरुवात झाली. स्पर्धेच्या आजच्या पहिल्या दिवशी भारताच्या पवन बर्तवाल या खेळाडूनं ५५ किलो वजनी गटात ब्राझीलच्या मायकल डग्लस दा सिल्वा त्रिनदेद या खेळाडूचा ३-२ असा पराभव केला. या स्पर्धेत भारताकडून २० खेळाडूंचा संघ सहभागी होत आहे. यात पुरुष संघात सुमित कुंडू, सचिन सिवाच, हर्ष चौधरी, जादूमणी सिंग मंडेन्गबम, हितेश गुलिया आणि अविनाश जामवाल असे खेळाडू आहेत. तर महिला संघात निखत जरीन, लवलिना बोरगोहेन, पूजा राणी या अनुभवी खेळाडू आहेत.

**<><><><>**

शिक्षक दिनानिमित्त राष्ट्रपती **द्रौपदी मुर्मू** यांनी देशभरातल्या शिक्षकांना शुभेच्छा दिल्या आहे. विकसित भारताते ध्येय साध्य करण्यासाठी जबाबदार, हुशार, आणि कुशल नागरिक तयार करण्यात शिक्षकांची भूमिका महत्त्वाची असल्याचं त्यांनी आपल्या संदेशात म्हटलं आहे.

शिक्षक दिनानिमित्त प्रधानमंत्री **नरेंद्र मोदी** यांनी आज दिल्लीत राष्ट्रीय पुरस्कार विजेत्या शिक्षकांशी संवाद साधला. शिक्षक हे एका मजबूत राष्ट्राचा आणि सक्षम समाजाचा पाया असून, युवाशक्तीचा व्यक्तीमत्व विकास आणि त्यांच्यातल्या उत्सुकतेला जागृत करण्याचं काम शिक्षक करत असल्याचं ते म्हणाले.

**//<><><><>//**